# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad

Date: 05 October 2023

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी औरंगाबाद**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०५ ऑक्टोबर २०२३ दुपारी १.०० वा.**

****

राजस्थानच्या विकासासाठी गेली नऊ वर्षं सरकार सातत्यानं प्रयत्न करत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते आज राजस्थानमधल्या जोधपूर इथं विविध विकास कामांच्या उद्घाटन,लोकार्पण आणि कोनशीला समारंभात बोलत होते. पाच हजार कोटी रुपयांच्या या विकासकामांमध्ये, रस्ते, रेल्वे, हवाई वाहतूक, आरोग्य आणि उच्च शिक्षण क्षेत्रांशी संबंधित विकासकामांचा समावेश आहे. यावेळी पंतप्रधानांनी राजस्थानसाठीच्या दोन नव्या रेल्वेगाड्यांना हिरवा झेंडा दाखवला.

****

राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी रजनीश सेठ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यपालांनी ही नियुक्ती केली आहे. त्यांची ही नियुक्ती पदाचा कार्यभार स्वीकारल्याच्या दिनांकापासून सहा वर्षांसाठी किंवा वयाची ६२ वर्षे पूर्ण होईपर्यंत जे आधी घडेल त्या कालावधीपर्यंत असेल असं शासनानं म्हटलं आहे. शासनाचे मुख्य सचिव मनोज सैनिक यांनी या संदर्भातली अधीसूचना प्रसिद्ध केली आहे.

****

राज्यात आवश्यक तिथं हेलिपॅड उभारणीसाठी तसंच हवाई रुग्णवाहिका सुविधा सुरू करण्यासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लिमिटेडला मध्यवर्ती संस्था म्हणून काम करता येईल, असा निर्णय या कंपनीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला .या कंपनीचे अध्यक्ष तथा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली .या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी शिर्डी, अमरावती, कराडसह विविध विमानतळांच्या विकासकामांचा आढावा घेतला .राज्यात शक्य असेल त्या ठिकाणी रात्री विमान उतरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. शिर्डी विमानतळाच्या सभोवतालचा परिसर विकसित

करण्यासाठीचे अधिकार या कंपनीला देण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला. याशिवाय शिर्डी इथं नवीन एकात्मिक स्थानक उभारणीसाठी पाचशे सत्तावीस कोटी रुपयांच्या प्रस्तावाला, आणि सध्या वापरात असलेल्या धावपट्टीच्या नूतनीकरणासाठी बासष्ठ कोटी रुपयांच्या खर्चाला या बैठकीत मान्यता देण्यात आली.

****

भारतानं आशियाई क्रीडा स्पर्धेमध्ये आज आणखी दोन सुवर्णपदकं जिंकली आहेत. स्क्वॅशमध्ये दिपीका पल्लीकल, हरिंदर पाल सिंह यांनी मिश्र दुहेरीमध्ये विजेतेपद मिळवलं आहे. ज्योती सुरेखा, आदिती गोपीचंद, परनित कौर यांच्या धनुर्विद्या कंपाऊंड संघानं चीनी ताईपेईच्या संघावर अंतिम फेरीत मात केली. कुस्तीमध्ये ५० किलोग्राम वजनगटात पूजा गहलोतनं आज उपांत्य फेरीत स्थान मिळवलं. भारतीय पुरुष कबड्डी संघानं चीनी तैपेईवर मात करुन उपांत्यफेरीत प्रवेश केला. बॅडमिंटनमध्ये पी. वी. सिंधूला उपउपांत्य फेरीत तसंच कुस्तीमध्ये अंतिम पंघालला पराभवाचा सामना करावा लागला. या स्पर्धेमध्ये आतापर्यंत २० सुवर्ण, ३१ रौप्य आणि ३२ कास्य पदकांसह एकूण ८३ पदकं जिंकून भारत चौथ्या स्थानावर आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेतली भारताची ही आतापर्यंतची सर्वोत्कृष्ट कामगिरी आहे.

****

नांदेडच्या डॉ .शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय- रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ .एस.आर .वाकोडे यांच्यासह बालरोग विभागातल्या डॉक्टरांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दवाखान्यात चोवीस तासात चोवीस रुग्णांचा, दुस-या दिवशी सात रुग्णांचा आणि सलग तिस-या दिवशी सहा रुग्णांचा मृत्यू झाल्याच्या अनुषंगानं ही कारवाई करण्यात आली आहे. सध्या या रुग्णालयात आठशे तेवीस रुग्ण दाखल असून पंचवीसहून जास्त बालक अत्यवस्थ असल्याची माहिती वैद्यकीय अधिका-यांनी दिली आहे.

****

केंद्रीय भूविज्ञान मंत्री किरेन रिजिजू यांनी आज महाबळेश्वर इथल्या हाय अल्टिट्युड क्लाऊड फिजिक्स लॅबोरॅटरीला अर्थात अती उंची वरील ढग भौतिकशास्त्र प्रयोगशाळेला भेट देऊन पाहणी केली. पुण्याच्या भारतीय उष्ण प्रदेशीय हवामान शास्त्र संस्थेची ही शाखा असून, इथं विशेषत: नैऋत्य मोसमी पावसाच्या ढगांच्या हालचालींचा अभ्यास केला जातो. यावेळी रिजिजू यांनी संस्थेतल्या शास्त्रज्ञांशी संवादही साधला.

****

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातल्या समस्या सोडवाव्यात, अशी मागणी खासदार डॉक्टर जयसिद्धेश्वर महास्वामीजी यांनी केली आहे. विभागीय रेल्वे समितीच्या मुंबईत झालेल्या बैठकीत ते बोलत होते. अमृत भारत योजनेअंतर्गत अक्कलकोट रोड आणि मोहोळ रेल्वे स्थानकांचा समावेश करावा, सांगोला – मंगळवेढा – सोलापूर नवीन रेल्वे मार्गाचं सर्वेक्षण करावं, असं त्यांनी म्हटलं आहे. दौंड ते कलबूर्गी आणि परत ही नियमित सेवा अथवा डेमू रेल्वे सुरू करावी, पंढरपूर ते वाराणसी नवीन रेल्वे सुरू करावी या मागण्याही खासदार जयसिद्धेश्वर महास्वामीजी यांनी या बैठकीत केल्या.

****

केंद्र शासन पुरस्कृत 'स्टँड अप इंडिया' योजनेअंतर्गत अनुसूचित जाती आणि नवबौद्ध प्रवर्गाला एकूण प्रकल्प किमतीच्या पंचाहत्तर टक्के रक्कम कर्ज म्हणून मिळते आणि पंचवीस टक्के रक्कम स्वत: भरावी लागते. आता या घटकाची आर्थिक परिस्थिती लक्षात घेत, या पंचवीस टक्क्यांपैकी पंधरा टक्के अनुदान समाज कल्याण विभाग देणार आहे.

****